International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.2 November – December 2022

# सिनेमाद्वारे महिलांच्या खेळांचा प्रचार : काही सिनेमांचे पुनरावलोकन

## (Promotion of Sports through Cinema: A Review of Few Cinemas)

**डॉ. अर्जुन जाधव**
डी.के.ए.एस. सी. कॉलेज, इचलकरंजी.
*Corresponding Author - डॉ. अर्जुन जाधव*
DOI - 10.5281/zenodo.10199416

**घोषवारा:**

*तत्कालीन समाज समजून घेण्यासाठी हे माध्यम चांगले आहे.ऐतिहासिक समाज सिनेमाच्या माध्यमातून समजून घेता येतो. तसेच भारतीय संस्कृती समजून घेण्यास मदत होते.सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिवर्तने समजतात. त्याच बरोबर समाज आणि चित्रपट यांच्यात देवाणघेवाण होते असते.चित्रपट हे संवादाचे उत्तम माध्यम आहे. सिनेमा प्रतिमा तयार करण्यात आणि नष्ट करण्यात हे माध्यम प्रभावी आहे.नातेसंबंध समजून घेण्यास मदत होते.हे माध्यम प्रेरणा आणि प्रोत्साहन देण्यासाठी वापरले जाते. प्रस्तुत शोधनिबंधात वरील मुद्द्यांच्या माध्यमातून सिनेमा आणि खेळ यांच्यामध्ये कशाप्रकारचे संबंध आहेत ते अधोरेखित करण्यात आले आले. सिनेमा भातातील खेळांना कशाप्रकारचे प्रोत्साहित करतात व सिनेमांच्या माध्यमातून खेळांचा कसा प्रचार होतो याचा काही सिनेमाच्या पुनरावलोकनातूनआढावा घेणेत आला आहे.*

**प्रस्तावना :**

भारत एक विविधतेने नटलेला देश आहे. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक, क्रीडाविषयक सर्वच गोष्टींमध्ये भारतात सुबत्ता आहे, तरीसुद्धा सर्वच गोष्टी सूक्ष्म पातळीपर्यंत मानव समाजाला पोहोचतातच असे नाही. समाजाच्या विकासासाठी वेगवेगळ्या दृष्टिकोनाशी संबंधित सरकार वेळोवेळी अनेक योजना, अनेक कार्यक्रम राबवत असते परंतु या योजनांचा प्रचार व प्रसार बऱ्याचदा सूक्ष्म पातळीपर्यंत पोहोचला जात नाही.

परंतु चित्रपटांच्या माध्यमातून या योजनांचा व कार्यक्रमांचा प्रसार व प्रचार लोकांपर्यंत जलद गतीने होतो. चित्रपट हे एक दृकश्राव्य प्रभावी माध्यम म्हणून ओळखले जाते. चित्रपटांमुळेच समाजामध्ये सामाजिक बदल होण्यास मदत होते.

याचाच एक भाग म्हणून संशोधकाने चित्रपटांद्वारे होणारा खेळांचा प्रचार असा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे. या संशोधन पेपरसाठी मी पाच चित्रपटांचा रिव्ह्यू करत आहे या रिव्ह्यूच्या माध्यमातून मला पुढीलप्रमाणे गोष्टी आढळून आल्या.

**दंगल:**

२३ डिसेंबर २०१६ मध्ये दंगल हा चित्रपट प्रदर्शित झाला. नितेश तिवारी यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केलेला आहे. या चित्रपटामध्ये प्रमुख

भूमिका अमीर खान, फतिमा शेख, सान्या मल्होत्रा, साक्षी तनवर यांनी केली आहे.

हरियाणा राज्यातील फोगट कुटुंबाची जीवनगाथा या चित्रपटामधून दाखवण्यात आलेली आहे. महावीर सिंग फोगट हे स्वतः कुस्तीपटू होते परंतु परिस्थितीमुळे त्यांना कुस्तीला पूर्णविराम द्यावा लागला. अर्थात कुस्तीगीरांना त्याकाळी काही आर्थिक साधने मिळत नव्हते, चरितार्थ चालवायचा कसा असा प्रश्न महावीर सिंग यांच्या वडिलांना पडला. कुस्ती हे आर्थिकतेचे साधन नाही म्हणून त्यांना महावीर सिंग यांना नोकरी करण्याचा मार्ग दाखवला. त्यामुळे कुस्तीचे स्वप्न अपुरे राहिल्यामुळे त्यांनी त्यांच्या दोन मुली गीता व बबिता यांना कुस्ती शिकवण्याचा निर्धार केला. त्यांचे अपुरे राहिलेले स्वप्न मुली पूर्ण करतील असा त्यांचा विश्वास होता. समाजाचा विरोध पत्करून, आपल्या मुली या मुलगाच आहेत असे समजून त्यांनी मुलींना कुस्तीतले आधुनिक प्रशिक्षण दिले आणि गीता व बबिता या कुस्तीतील भारतातील प्रसिद्ध महिला खेळाडू बनल्या.

एकंदरीत समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून या चित्रपटाकडे बघितले तर लक्षात येते कि, सामाजिक सुधारकांचे जग म्हणून आपण २१ व्या शतकाकडे बघत असलो तरी आजही अनेक भागामध्ये जसे हरियाणा, मुलगा मुलगी असा भेद कायम आहे. चित्रपटामध्ये देखील सुरुवातीला लिंगभेद फोगट कुटुंबात केला जात होता हे लक्षात येते. महावीर सिंग फोगट व कुटुंबियांना मुलगा पाहिजे होता जेणेकरून कुस्तीचे प्रशिक्षण त्याला देता येईल आणि महावीर सिंगांचे स्वप्न पूर्ण होईल. परंतु त्यांना सर्व कन्यारत्नच पदरात पडले. मुलगा होण्यासाठी अनेक देवारुशी झाले परंतु त्यांना मुलीच झाल्या. या सर्व गोष्टीवरून हरियाणा राज्यात मुलीपेक्षा मुलाला प्रतिष्ठेचे स्थान असल्याचे लक्षात येते.

सर्व कन्यारत्नच झाल्यामुळे महावीर सिंगनी या मुलींनाच कुस्तीचे धडे देण्याचे ठरवले तेव्हा गावातल्या लोकांनी तीव्र विरोध केला. मुली कधी असले लांडे कपडे घालतात का? मुली कधी शड्डू ठोकून आखाड्यात उतरतात का? त्यांचे लग्न कसे होणार? असे अनेक प्रश्नांनी फोगट यांना गोंधळून टाकले.

या सर्व प्रश्नांवरून असे लक्षात येते कि, हरियाणा सारख्या राज्यात आजही लिंगभाव जोपासला जातो. समाजातील घटकांनीच प्रत्येक व्यक्तीला लहानपणापासून बिंबवलेले असते जसे मुलगा कुस्ती – मुलगी भातुकली खेळते, मुलगा विजार शर्ट – मुलगी फ्रॉक थोडक्यात सर्व अंग झाकले जाईल असे वस्त्र, मुलगा साहसाचे खेळ – मुलगी चार भिंतीतले खेळ. म्हणजेच समाजातील घटकांनी असे लोकांच्या मनात बिंबवले असल्यामुळे अशा लिंगभावाविरुद्ध जर एखाद्या स्त्रीने कृत्य केले तर समाजातील लोक ते स्वीकारत नाहीत तर नाकारतात, वाळीत टाकतात. असाच प्रकार फोगट भगिनींच्या मध्ये झालेला दिसतो.

कुस्ती हा मर्दानी खेळ म्हणून आजही २१ व्या शतकात समाजले जाते. त्यामुळे फोगट भगिनी जेव्हा कुस्ती क्षेत्राकडे आल्या तेव्हा समाजाने त्यांना विरोध केला. कुस्ती खेळल्यामुळे कान मोठे होतात,

अवयव दुखावतात मग अशा अवस्थेत तुमच्याशी लग्न कोण करेल असे प्रश्न लोक त्यांना विचारात असत. फोगट भगिनींचा पोशाख, त्यांची केसांची रचना, आहार, प्रशिक्षण इत्यादी सर्व गोष्टीत समाजाने जोपासलेला लिंगभाव अगदी तंतोतंत लक्षात येतो.

मुलींना कमी लेखणाऱ्या समाजाचा दृष्टीकोन बदलावा आणि मुलींनीही स्वसंरक्षणासाठी सक्षम व्हावे या हेतूने महावीर सिंग फोगट यांनी कुस्तीकडे मुलींना वळवले. पुरुषसत्ताक मानसिकतेला आव्हान देत तसेच रूढी, प्रथा, परंपरांच्या बेड्या तोडत फोगट भगिनींनी मुली म्हणजे सध्या, सरळ आणि नाजूक हा गैरसमज खोटा ठरवलेला आहे. हरियाणा सारख्या प्रगत राज्यात मुलींच्या बाबतीत केला जाणारा भेदभाव फोगट भगिनींमुळे गौण ठरला असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही. दंगल सारख्या चित्रपटातून लिंगभेद व लिंगभाव न करता मुलगा मुलगी समान आहेत हा अजेंडा सर्व समाजाला लागू होतो हे लक्षात येते.

**मेरी कोम :**

मेरी कोम हा चित्रपट ओमंग कुमार यांनी दिग्दर्शित केला आहे. ५ सप्टेंबर २०१४ मध्ये हा चित्रपट प्रदर्शित झाला. भारतातील प्रसिद्ध जागतिक पातळीचा दर्जा असलेली अव्वल बॉक्सिंगपटटू मेरी कोम यांच्या जीवनकथेवर आधारित हा चित्रपट आहे. या चित्रपटातील मेरी कोमची प्रमुख भूमिका प्रियांका चोप्रा या अभिनेत्रीने केली आहे.

भारतातील मणिपूर राज्यातील कांगथै या दुर्गम भागामध्ये मेरी कोम वास्तव्यास होत्या. पाण्याची, विजेची, दळणवळण साधनांची टंचाई असलेल्या गावामध्ये मेरी कोम आई वडील आणि भावंडासमवेत राहत होती. घरची परिस्थिती अत्यंत बिकट होती. कोम घरच्यांना जळणासाठी लाकूड आणणे, शेतीतील कामे, स्वयंपाक इत्यादीमध्ये हातभार लावत होती. शाळेतील कोमचे राहणीमान पाहता अभ्यासामध्ये ती मध्यम होती परंतु तिचा क्रीडाक्षेत्रामध्ये चांगला सहभाग होता. एकंदरीत सर्वांच्या निरीक्षणातून मेरी कोम खेळामध्ये तरबेज आहे, तिने त्याच्यातूनच करियर करावे म्हणजे सरकारी नोकरी मिळेल असे लोक सुचवायला लागले. परंतु मेरीच्या वडिलांना ते मान्य नव्हते कारण आपण कमी शिकल्यामुळे आपल्याला असे दारिद्यात राहावे लागले तेच मेरीच्या आयुष्यात होऊ नये असे त्यांना वाटले परंतु मेरीचा स्वभाव हटटी होता. मेरीने प्रशिक्षणासाठी जाण्याचे ठरवले. बॉक्सिंग खेळाची आवड निर्माण झाली.

परिस्थिती हलाकीची असल्यामुळे मेरीला काही काळ साधनानिशी सराव करताच येत नव्हता कारण ती साधने प्रचंड महाग होती. कालांतराने तिला वेगवेगळ्या माध्यमातून आर्थिक मदत मिळत गेली आणि तिचे स्वप्न ती पूर्ण करू शकली. अत्यंत कठीण परिस्थितीत कोमने तिचे वेगळे आयुष्य निर्माण केले जिने भारतातील तिसऱ्या क्रमांकाची महिला खेळाडू जिने ऑलिम्पिक मध्ये बॉक्सिंगमध्ये कांस्यपदक मिळवले.

एकंदरीत या चित्रपटाकडे बघितले तर एका सामान्य कुटुंबातील मुलगी आर्थिक परिस्थिती बिकट असून देखील परिस्थितीशी सामना करत ऑलिम्पिक पदक मिळवते हि असामान्य गोष्टच म्हणावी लागेल. बॉक्सिंग खेळल्याने अवयवांना दुखापत होईल, शरीर दुबळे होईल अशा अवस्थेत विवाह कोण करेल या भीतीने मेरीचे वडील प्रथम थोडा विरोध केले परंतु त्यानंतर त्यांनी पूर्णपणे पाठींबा दिला.

सुरुवातीला मेरी साधनांव्यतिरिक्त सराव करत होती कारण सर्व साधने महागडी होती. या वाक्यावरून असे जाणवते कि प्रशिक्षण केंद्रावर योग्य ती साधने उपलब्ध नसल्यामुळे तसेच आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे काही वेळा स्वप्नांशी झुंजत राहावे लागते.

चित्रपटातील एका प्रसंगामधून प्रादेशिकवाद जोपासलेला दिसतो. एका स्पर्धेमध्ये प्रमुख पाहुण्यांच्या जवळची व तेथील प्रदेशातील मुलगी आणि राष्ट्रीय पातळीवर खेळणारी मेरी अशी स्पर्धा सुरु होते. त्यावेळी गुण समान झाल्यामुळे त्या प्रदेशातील मुलगीला विजेते घोषित केले जाते. राग सहन न झाल्यामुळे मेरी परीक्षकांना संतापून बोलते तेव्हा मेरीला खेळण्यास मनाई केली जाते. या गोष्टीवरून प्रादेशिकवाद व परीक्षकांचा बायसनेस स्पष्टपणे दिसून येतो.

जागतिक पातळीवरील महिला खेळाडूंना त्या संघटनेची साथ ती पण सकारात्मक मिळणे गरजेचे आहे कारण त्या खेळाडूमुळे आपल्या देशाची शान वाढलेली असते. चित्रपटामध्ये मेरी कोमने भावना व्यक्त केली आहे ती म्हणते, " भारतामध्ये खेळत मुले मुली मागे आहेत कारण इथे असलेल्या सोयी - सुविधा, साधनांची आणि पौष्टिक आहाराची कमतरता." जर या सोयी तुम्ही योग्य त्या वेळी दिल्या तर भारत एक नंबरचा देश होईल. यावरून असे जाणवते कि भारतामध्ये पायाभूत सुविधांची कमतरता आहे.

अत्यंत बिकट परिस्थितीत, आर्थिक गोष्टींच्या कमतरतेतून सामना करीत मेरी कोम आपला संसार, अपत्ये सांभाळून भारतातील विविध स्पर्धांमध्ये विजयी होते आणि ऑलिम्पिक मध्ये कांस्यपदक मिळवते.

एवढ्या संघर्षानंतर सुद्धा आज अनेकांना मेरी कोम माहित नाही हि दुर्दैवाची बाब म्हणावी लागेल. भारतासाठी लढलेल्या एका महिला खेळाडूचा संघर्षमय इतिहास तरुण पिढीला माहित करून देणे काळाची गरज आहे.

**चक दे इंडिया:**

चक दे इंडिया हा चित्रपट शिमित अमीन यांनी दिग्दर्शित केला आहे. ऑगस्ट २००७ मध्ये हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटातील प्रमुख भूमिका शाहरूख खान, विद्या माळवदे, सागरिका घाडगे यांनी केली आहे. चित्रपटामध्ये प्रामुख्याने कबीर खान, विद्या शर्मा व प्रीती सबरवाल या नावाने त्यांना ओळखले जाते.

कबीर खान हा हॉकी संघामध्ये उत्कृष्ट खेळणारा खेळाडू असतो. भारत पाकिस्तान हॉकी स्पर्धेत पाकिस्तान जिंकते. त्यानंतर कबीर खान

पाकिस्तानच्या कॅप्टनला आलिंगन देतो ते चित्र प्रसारमाध्यमांना पोचते आणि त्यानंतर कबीर खान विरोधात चर्चा सुरु होते. देशद्रोही म्हणून त्याला बाहेर काढले जाते. त्यानंतर सात वर्षांच्या कालावधीनंतर त्याला एक संधी मिळते ती महिला हॉकी संघाचा प्रशिक्षक म्हणून बनण्याची.

परंतु जेव्हा राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा खेळण्यासाठी महिला हॉकी संघाची चर्चा सुरु होते तेव्हा महिला संघाला दुय्यम लेखले जाते. भांडी धुणी करणाऱ्या या मुली, लांडे कपडे घालून काय देशासमोर येणार, यांना कोण प्रशिक्षक मिळणार, प्रायोजक कोण मिळणार असे उद्गार संघटनेच्या मुख्य अधिकाऱ्यांनी काढलेले असतात. तेव्हा हि प्रशिक्षकाची जबाबदारी कबीर खान घेतो. मुलींच्या हॉकी संघामुळे आपले बरेच नुकसान होणार असे संघटनेला वाटते त्यामुळे ते मुलींना स्पर्धेत उतरवण्यासाठी विरोध करतात पण मुलींच्या अथक सरावामुळे महिला हिकी संघाला स्पर्धेसाठी मान्यता मिळते.

एक प्रशिक्षक या नात्याने कबीर खान आपल्यावरील लागलेला कलंक जाण्यासाठी अपार मेहनत घेतो. तेरा जणींच्या या संघाला कबीर खान उत्तमपणे प्रशिक्षण देत असतो परंतु या महिला संघामध्ये एकमेकात एकता नसते. प्रत्येक जण वेगवेगळ्या स्वभावाचा असल्यामुळे कबीर खानला प्रथम अवघड जाते पण नंतर सर्व एकत्र येतात आणि चांगली कसून तयारी करतात. हॉकी संघाचा कॅप्टन असलेली विद्या शर्मा हिला घरचे फोन करून अडथळा निर्माण करत असतात. भावानिकतेची भुरळ तिला पाडत असतात परंतु ती कबीर खानला सांगते, “मी आज गेले तर परत काढीत इकडे येवू शकणार नाही” यावरून कुटुंबाची खेळाबाबतची नावड लक्षात येते.

या हॉकी संघामध्ये उत्कृष्ट गोल करणारी प्रीती सबरवाल, जिचे प्रेमसंबंध क्रिकेट संघाच्या कर्णधाराशी होते. एके भेटीवेळी तो तिला आपल्यापेक्षा दुय्यम समजतो आपला क्रिकेट हा उच्च दर्जाचा खेळ आहे. हॉकी काय खेळतेस, खेळणे सोड आपण लग्न करतोय असे सांगतो. प्रीती सबरवाल त्याने दिलेली दुय्यमतेची वागणूक बघून आणि एका स्त्रीला कमी लेखलेले पाहून नाराज होते आणि संघामध्ये परत येते. यावरून हॉकी या राष्ट्रीय खेळाला दुय्यम मानले जाते हे लक्षात येते.

हॉकी संघामधील प्रत्येक मुलीच्या स्वभावाशी जुळवून घेत कबीर खान उत्तम संघ तयार करतो आणि त्यांना एकच संदेश देतो, “सामना तुमचा त्यांच्याशी आहे जे तुम्हाला कमी लेखतात. त्यांना सांगा एका स्त्रीनेच तुम्हाला जन्माला घातले आहे. ती गोष्ट आम्ही सहन करतो तर हॉकी खेळणे आणि जिंकणे आम्हाला सहज सोपे आहे.” हा संदेश समोर ठेवून आणि योग्य प्रशिक्षणामुळे त्या हॉकी वर्ल्ड कप जिंकतात जे आजपर्यंत कधी कुणाला शक्य झाले नाही आणि दाखवून देतात कि महिला पण हॉकीमध्ये मागे नाहीत.

एकंदरीत विचार करता कबीर खान मुस्लीम असल्यामुळे पाकिस्तानच्या संघाला जिंकून दिले या आरोपावरून हाकलून देण्यात आले, देशद्रोही

समजण्यात आले. तो मुस्लीम आहे म्हणून त्याने पाकिस्तानच्या संघाला मदत केली असा दावा करण्यात आला. याठिकाणी चांगल्या खेळाडूंचे जीवन धार्मिक तेढ निर्माण करून बरबाद केले हे लक्षात येते.

इंडिअन हॉकी असोसिएशन च्या अधिकाऱ्यांनी देखील या चित्रपटात लिंगभाव असमानतेसंदर्भात भाष्य केले. त्यांनी मुली आहेत, त्या काय खेळणार, शेवटपर्यंत कुठे टिकणार आहेत, त्यांच्याकडून आपल्याला काय फायदा असे भाष्य यामध्ये आलेले आहे. खरे पाहता एका देशातील त्या खेळाचे अधिकारी जर असा लिंगभाव करायला लागले तर भारत खेळामध्ये प्रगती करू शकणार नाही. त्यामुळे मुली व मुले यांना योग्य आणि समानतेने प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

या हॉकी संघामधील दोन खेळाडू ज्यांना कुटुंबातील व्यक्तींच्या वागणुकीमुळे व्यत्यय निर्माण झाला. कुटुंबाकडून नसलेला पाठींबा आणि मुली खेळताहेत म्हणून त्या खेळाला दुय्यम समजणे या गोष्टी मुलींच्या सहभागावर निश्चित परिणाम करतात.

एकंदरीत सर्व चित्रपटातून असे जाणवते कि, भारताचा राष्ट्रीय खेळ हॉकी असून देखील त्या खेळाकडे तेवढ्या आकर्षिकतेने बघितले जात नाही जेवढे क्रिकेटला बघितले जाते. त्याचबरोबर महिला संघाला दुय्यम समजले जाते, महिलांच्या खेळाडू वृत्तीकडे दुय्यम दर्जाने पहिले जाते.

संघामधील एकता, योग्य प्रशिक्षक, खेळाडू महिलांना योग्य प्रोत्साहन देण्याची मानसिकता, लिंग समानता, देशप्रेम इत्यादी गोष्टी जर आत्मसात केल्या तर निश्चितच भारताची खेळातील पदकांची संख्या वाढेल यात शंका नाही. ज्या पद्धतीने देशद्रोही कलंक लागलेल्या कबीर खानने महिला संघाचे नेतृत्व केले, जो संघ भेदभावामुळे कोणीही घेण्यासाठी तयार नव्हता, त्या संघाला योग्य प्रशिक्षण देऊन त्याने भारताला वर्ल्ड कप जिंकून दिला आणि आपल्यावरील कलंक खोटा ठरवला हि अभिमानाचीच बाब म्हणावी लागेल.

**सांड कि आंख:**

तुषार हिरानंदिनी यांनी सांड कि आंख हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे. २५ ऑक्टोबर २०१९ रोजी हा चित्रपट प्रदर्शित झाला. उत्तर प्रदेशातील जोहरी या गावातील टोमर या कुटुंबावर आधारित प्रस्तुत चित्रपट आहे. प्रमुख भूमिका तापसी पन्नू, भूमी पेडणेकर, प्रकाश झा यांनी केलेली आहे.

उत्तर प्रदेशातील या टोमर कुटुंबामध्ये एके दिवशी रायफल शुटींग शिकवणारे प्रशिक्षक येतात आणि मुली व मुलांना दोघांनाही हे प्रशिक्षण घेण्यासाठी पाठवा असे सांगितले जाते परंतु टोमर कुटुंबप्रमुख प्रकाश झा यांनी 'मुलगीच्या हातामध्ये बंदूक शोभणार नाही, मुलांच्याच हातामध्ये बंदूक पाहिजे' असे उत्तर देत मुलींना रायफल शुटिंगला जाण्यासाठी नकार दिला. परंतु रायफल शुटींग म्हणजे काय याची उत्सुकता चार भिंतीमाध्येच चूल, प्रजोत्पादन, बालसंगोपन करणाऱ्या ६० वर्षीय चंद्रो टोमर यांना लागते. त्या आपल्या नातीला घेऊन गुपचूपपणे प्रशिक्षण केंद्रावर जातात. नातीचा

निशाणा बरोबर बसत नाही परंतु चंद्रो टोमर यांचा निशाणा बरोबर लागतो. एका निरक्षर आणि वयाने जास्त असलेल्या महिलेचा नेम बसलेला पाहून प्रशिक्षक त्यांना सरावासाठी येण्याचा आग्रह धरतात. त्यानंतर घरात न पत्ता लागता चंद्रो टोमर घरातील काही महिलांना सुद्धा प्रशिक्षणासाठी नेतात आणि बरीच पदके मिळवतात अशी या चित्रपटाची थोडक्यात कथा आहे.

एकंदरीत समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून बघता टोमर कुटुंब हे पुरुषसत्ताक व्यवस्था असलेले आहे. कुटुंब प्रमुख रतन सिंग टोमर म्हणजेच प्रकाश झा यांचा खूपच पगडा आहे. कुटुंब नियोजन नसल्यामुळे मुलांचे जन्मण्याचे प्रमाण देखील टोमर कुटुंबामध्ये अधिक आहे. घरातील स्त्रियांना बंधनामध्येच राहावे लागते जसे 'पडदा पद्धत'. त्याचबरोबर त्यांनी केवळ चूल आणि मुल, थोडीफार शेतीतील कामे करायची. एकंदरीत त्यांचे आयुष्य हे जानावरांसारखेच होते असे चंद्रो टोमर यांनी व्यक्त केले आहे.

घरातील हक्कांपासून आणि अधिकारांपासून वंचित अशा टोमर कुटुंबातील स्त्रिया होत्या. पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे आणि कुटुंबप्रमुख पेशाने सरपंच असल्याने घरातील स्त्रियांना नेहमीच दुय्यम स्थान दिलेले लक्षात येते. त्याचबरोबर लिंगभाव देखील असलेला दिसतो कारण "बंदूक मुलींच्या हातात शोभत नाही, चूल आणि मुल एवढेच त्यांनी करायचे" या वाक्यांवरून लिंगभाव असलेला दिसून येतो.

एवढ्या सर्व बंधनातून चंद्रो टोमर धाडसाने मोठा निर्णय घेतात तो म्हणजे रायफल शुटींग खेळण्याचा. मुलींना बंदूक शोभत नाही या वाक्याला फाटा देत त्यांनी सराव सुरु केला आणि घरातील स्त्रियांना देखील हा खेळ खेळण्याची आवड निर्माण केली. एक निरक्षर, अडाणी स्त्री पाहून स्पर्धेसाठी आलेल्या लोकांनी त्यांची चेष्टा करायला सुरुवात केली परंतु त्यांचा निशाणा पाहूनच सर्वांची खिल्ली उडाली. यावरून माणसे दिसण्यावरून समोरच्या व्यक्तीचे मोजमाप करतात हे लक्षात येते.

राष्ट्रीय स्पर्धेला जाण्याची जेव्हा वेळ येते तेव्हा शेवटी चंद्रो टोमर आणि प्रकाशी टोमर कुटुंबाला सांगतात तेव्हा प्रचंड संताप कुटुंबामध्ये होतो आणि शेवटी चंद्रो टोमर आम्हाला राहूदे पण नातीला सोडा, पदक मिळवेल आणि सरकारी नोकरी मिळेल असे सांगतात. अथक प्रयत्नानंतर नातीला स्पर्धेला जाण्यासाठी परवानगी मिळते.

या प्रसंगावरून देखील पुरुषप्रधान संस्कृतीमुळे रतनसिंग टोमर यांनी महिला असल्यामुळे चंद्रो टोमर यांना मनाई केली हे लक्षात येते. 'घराण्याची प्रतिष्ठा, गावची प्रतिष्ठा, गावातील रितीरिवाज, राजकारणातील पद, पुरुषसत्ताक व्यवस्था, स्त्रियांचे चूल व मुल एवढेच काम, अनिष्ठ प्रथा, परंपरा' इत्यादी अनेक कारणांमुळे टोमर कुटुंबातील स्त्रियांना चार भिंतीमध्येच ६० वर्षापर्यंत राहावे लागले परंतु चंद्रो टोमर यांनी सर्व बंधने झुगाडत आपले ध्येय साध्य केलेच.

**रश्मी रॉकेट:**

आकर्ष खुराना यांनी रश्मी रॉकेट हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे. १५ ऑक्टोबर २०२१ रोजी रश्मी रॉकेट हा चित्रपट प्रदर्शित झाला. प्रस्तुत चित्रपटामध्ये प्रमुख भूमिका हि रश्मी या पात्राची आहे. हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनेत्री तापसी पन्नू हिने या रश्मी पात्राचे काम केले आहे. चित्रपटामध्ये एका महिला अथलेटिक्सचे जीवन आणि तिच्यावर होणारी संघटनेची भ्रष्टाचारी वर्तणूक दाखवलेली आहे.

रश्मी ही एका लहान शहरातील, सर्वसामान्य घरातील मुलगी असते जी अथलेटिक्स मध्ये तरबेज असते. कोणतेही प्रशिक्षण न घेता तिने अथलेटिक्समध्ये प्रगती केलेली असते. इतरांपेक्षा ती जास्त वेगाने धावत असल्या कारणाने तिला 'रॉकेट' असे संबोधले जात होते.

राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी रश्मीची निवड झालेली असलामुळे तिला अथलेटिक्स असोसिएशन मध्ये सरावासाठी पाठवले जाते. तिथे देखील रश्मी चांगली प्रगती करते आणि वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये जिंकते. असोसिएशन चे मुख्य म्हणून ज्यांनी भूमिका केलेली आहे ती खलनायकाची भूमिका आहे. या चित्रपटामध्ये चोप्रा या नावाने त्यांनी काम केलेले आहे. या चोप्रा यांची कन्या देखील अथलेटिक्स मध्ये असते परंतु म्हणावी तितकी सरस नसते. रश्मिपेक्षा कितीतरी ती मागे असते परंतु भारताचे प्रतिनिधित्व माझ्या कन्येने करावे, अथलेटिक्स असोसिएशनचा मुख्य म्हणून आपली इज्जत राखली जावी या अनुषंगाने चोप्रा यांनी कटकारस्थान रचले.

मेडिकल असोसिएशनला पाठीशी घेऊन एवढ्या खेळाडूंपैकी केवळ रश्मीची जेंडर टेस्ट केली जाते, ती पण तिला कशाचीही माहिती न देता, तिची कागदावर सही घेऊन आणि त्या टेस्टमधून तिच्यामध्ये पुरुषी जनुके असल्यामुळे ती पुरुषी आहे असा आरोप तिच्यावर लावला जातो आणि खेळण्यास तिच्यावर बंदी घातली जाते.

ज्यावेळी रश्मी जेंडर टेस्ट करून हॉस्टेलवर येते तेव्हा चोप्रांची कन्या तिला पुरुष म्हणून चिडवते. साहजिकच राग सहन न झाल्यामुळे रश्मी तिला मारते. काही कालावधीत चोप्रा पोलिसांना फोन लावतात आणि लेडीज हॉस्टेल मध्ये पुरुष राहतोय अशी तक्रार देतात. तत्काळ पोलीस येवून रश्मीला अटक करतात ती पण काहीही माहिती न सांगता. यानंतर हि केस कोर्टामध्ये दाखल होते आणि रश्मीवरील सर्व अन्याय दूर होतात आणि तिला खेळण्यासाठी परवानगी दिली जाते.

एकंदरीत विचार करता चित्रपटातली मुख्य भूमिका केलेला पात्र रश्मी हि एका सामान्य कुटुंबातली मुलगी आहे. जेव्हा सामान्यांनी असामान्य असे कार्य केले जाते तेव्हा समाजातील घटक उफाळून वर येतात. रश्मी सारख्या सामान्य मुलीला मागे ओढण्यासाठी तिच्यावर टू पुरुषी आहेस असा आरोप लावला जातो.

एका सामान्य मुलगीचे नाव सर्वत्र होत आहे त्यामुळे स्वतःच्या पदाचा गैरवापर करून रश्मीवर अन्याय केले गेले आणि तिला खेळ

सोडण्यास भाग पाडले. गरीब – श्रीमंत भेद, सामान्य व्यक्तीला जिंकण्यासाठी येणारी मर्यादा, पदाचा गैरवापर, खोटे आरोप, क्रीडाक्षेत्रातील भ्रष्टाचार, आर्थिक परिस्थिती इत्यादी सर्व मुद्यांमुळे रश्मीसारख्या सामान्य मुलीला खोट्या आरोपाखाली काही काळ राहावे लागले. क्रीडाक्षेत्रातील एक विदारक दृश्य, महिला खेळाडूंवर होणारे अन्याय - अत्याचार या चित्रपटातून कळण्यास मदत झालेली आहे.

**निष्कर्ष :**

आजच्या युगामध्ये चित्रपट हे प्रभावी माध्यम बनलेले आहे. चित्रपटांच्या माध्यमातून समाजातील घटकांना प्रोत्साहन मिळते. दंगल, मेरी कोम, सांड की ऑंख, रश्मी रॉकेट, चक दे इंडिया यांसारख्या चित्रपटातून समाजातील बंधनांचा तिरस्कार करून आपले ध्येय साध्य करणे तसेच जीवनामधील अडचणी व समस्यांना लाथाडून, झुगारून महिला खेळाडूंची यशोगाथा अशा प्रकारच्या चित्रपटातून समोर येते. काही वर्षांपूर्वी खेळातील मुलींचा सहभाग हा मोजकाच असायचा परंतु आजकाल खेळातील मुलींचा सहभाग वाढलेला दिसतो. त्याबरोबर पूर्वी खेळ हा उच्च कुटुंबातीलच जाती-धर्मांसाठी मानला जात होता. परंतु आज ग्रामीण भागातील, तळागाळातील लोकांपर्यंत खेळ पोहोचत आहे आणि त्या माध्यमातून नवनवीन खेळाडू तयार होताना आपल्याला पाहायला मिळतात आणि देशाचा नावलौकिक करण्यामध्ये ही त्यांचे योगदान लाभत आहे. अशा चित्रपटांमुळे देशातील अनेक महिलांना आदर्शात्मक प्रेरणा मिळेल हे नक्कीच.